दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.२५ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ४० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 25 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 40 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी दिलासा मिळेल

**मुंबई**–राज्यातील पूरपरिस्थिती गंभीर बनल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी २२१५ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना ही मदत निश्चित करण्यात आली असून पुढील आठ ते दहा दिवसांत ही रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल. स्थानिक प्रशासनाला यासंबंधी स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. नुकसानीच्या निकषांमध्ये शिथिलता आणून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मदतीचा लाभ मिळावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे.

# एकही एकर पंचनाम्याविना राहू नये
# जमीन आणि विहिरींचेही पंचनामे करा
## कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांचे आदेश; अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–जालना जिल्ह्यात प्राथमिक स्वरूपात २ लाख ५४ हजार एकर क्षेत्राचं नुकसान झालं आहे. तर, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये प्राथमिक अंदाजानुसार राज्यात ३३ लाख ५१ हजार १७५ हेक्टर म्हणजे ८३ लाख ७७ हजार ९३७ एकर क्षेत्र बाधित आहे. सप्टेंबर महिन्यात जास्त पाऊस पडला आहे. सप्टेंबर पूर्वीचा विचार केला तर नुकसान थोडं कमी होतं. कृषी विभाग आणि महसूल विभागाकडून पंचनाम्याचं काम युद्ध पातळीवर सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील आज नुकसानग्रस्त भागांची पाहणी करत आहेत त्यामुळे त्यांचं सर्व परिस्थितीवर बारकाईनं लक्ष आहे. लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज जालना जिल्ह्यातील बदनापूर व अंबड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली. सलग पडत असलेल्या पावसामुळं शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं असून, शेतकरी अडचणीत सापडला आहेत. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन मंत्री दत्तात्रय भरणे यांनी थेट



शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पाहणीदरम्यान मंत्री भरणे यांनी अधिकाऱ्यांना थेट दूरध्वनीवरून सूचनादेखील दिल्या आणि काही ठिकाणी कामकाजातील सुस्तगतीबाबत नाराजी व्यक्त केली.पाहणी दरम्यान शेतकऱ्यांनी सोयाबीन, कपाशी, तूर यांसारख्या पिकांचे नुकसान, जमिनीवर पाणी साचल्याने उभ्या पिकांची झालेली हानी, रस्ते व पायाभूत सुविधांवर झालेला परिणाम याबाबत कृषी मंत्री भरणेंना माहिती दिली. यावर गांभीर्यानं लक्ष देत मंत्री भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ फोन लावून, एकही शेतकरी पंचनाम्यात वंचित नाही राहिला पाहिजे. नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याचा पंचनामा करण्यात यावा. शेती, गुरं, विहिरी या सर्व गोष्टींचे पंचनामे करा, असे आदेश मंत्री दत्तात्रय भरणे यांनी अधिकाऱ्यांना दिले.मंत्री भरणे म्हणाले की, शेतकऱ्यांना न्याय मिळावा ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे. कुठल्याही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवलं जाणार नाही. ज्याचं नुकसान झालं, त्यांचं सगळं नुकसान नोंदवून घ्या. मी तुम्हाला मंत्री म्हणून सांगतो, शेतकऱ्याच्या एक गुंठ्याचा पंचनामा जरी राहिला तर त्याला तुम्ही जबाबदार असाल, असा इशारा त्यांनी अधिकाऱ्याला दिला. शेतकरी खूप अडचणीत आहे. तो वंचित राहणार नाही याची काळजी घ्या. असेही त्यांनी बजावले.

# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्या–महादेव घुले

**केज । प्रतिनिधी**

मागील पंधरा दिवसापासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांची शेती मातीसगट वाहून गेली आहे.जनावरे गुरे वाहून गेली आहेत.बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट ५० हजार रु शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे केज तालुकाध्यक्ष महादेव घुले यांनी केली आहे.



बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजारांची मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.सध्या बीड जिल्ह्यात सर्वच तालुक्यात पावसाने मोठे नुकसान झाले असुन सोयाबीन,कापुस पुर्णतः हातातुन गेले आहे.नदीकाठचे घरे, जनावरे वाहुन गेली असुन प्रत्येक गाव या अतिवृष्टीने बाधित झाले आहे.कोणतेही पंचनामे न करता जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची अर्थिक मदत तात्काळ द्यावी सद्य स्थितीत जिल्ह्यातील सर्वच नद्या आपले पात्र सोडुन १ ते १.५ कि.मी क्षेत्रातुन वाहत आहेत त्यामुळे अतोनात नुकसान झाले आहे.अनेक गावात पाणी शिरले असुन जनावरांचे गोठे वाहुन गेले असून पशुधनाची देखील जिवीत हानी झाली आहे. त्यामुळे आपण सबंध जिल्हा ओला दुष्काळ म्हणून जाहिर करावा व ज्याची घरे,जनावरे वाहुन गेली त्यांना वेगळी वेगळी मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे. अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे.शेतकऱ्यांना सरसगट मदत मिळाली पाहिजे केज तहसीलदार यांच्या मार्फत थेट मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे निवेदन देण्यात आले.शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे केज तालुकाध्यक्ष महादेव घुले यांनी व्यक्त केला.शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळेपर्यंत पाठपुरावा करत राहणार असल्याचे सांगितले.यावेळी केजचे तहसीलदार यांना निवेदन देतांना मनसेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष कल्याण केदार,तालुकाध्यक्ष अतुल कुलकर्णी,तालुका उपाध्यक्ष महेश कुलकर्णी,तालूका सचिव प्रवीण साखरे, उपाध्यक्ष सौरभ हिरवे,सुरज डोईफोडे,उत्तरेश्वर बारगजे उपस्थित होते.

# जिल्ह्यात पावसाने हाहाकार शेतकऱ्यांचे मोठे नुकसान
## नाळवंडी सर्कल मधील सरसकट पंचनामे करावेत–शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने अक्षरशः थैमान घातले असून जिल्हाभर हाहाकार माजला आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतांमध्ये अक्षरशः पाण्याचे डोह तयार झाले असून बहुतेक पिके पाण्याखाली गेली आहेत. विशेषतः नाळवंडी सर्कल परिसरात ही परिस्थिती गंभीर असून सोयाबीन, मूग, उडीद, कापूस अशा प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे कष्ट एका क्षणात वाहून गेले आहेत. त्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. यामुळे प्रशासनाने शेतकऱ्यांचे नाळवंडी सर्कल मधील सरसकट पंचनामे करावे व प्रशासनाने तातडीने मदत करावी अशी मागणी नागेश शिंदे यांनी केली आहे. सध्या शेतकऱ्यांचे जगणे कठीण झाले असून त्वरित सर्व पिकांचे सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई जाहीर करावी. प्रशासनाने तातडीने पाहणी करून



शेतकऱ्यांना भरपाई द्यावी. अशी मागणी नागेश शिंदे, बाबासाहेब जाधव, नारायण देवकते, हरिदास वाघमारे, राहुल कोरडे, प्रकाश ससाणे, बाबुराव भालेराव, बाळासाहेब वाघमारे, सुंदर वाघमारे, अनंत विद्याधर, शरद देवकते, ज्ञानेश्वर देवकते आदींनी केली आहे.

# शेतकऱ्याची कर्जमुक्ती करण्याची हीच ती वेळ
## लातूरात क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली मुख्यमंत्र्याची भेट



**लातूर । नदीम पटेल**

राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक वेळा शेतकऱ्याच्या कर्जमुक्ती संदर्भात योग्य वेळ आल्यास कर्जमुक्ती देऊ अशा घोषणा केल्या होत्या त्या घोषणा सत्यात उतरण्याची हीच ती वेळ असून मुख्यमंत्र्यांना निसर्गाने संधी दिली आहे.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेने मुख्यमंत्र्यांची लातुरात भेट घेतली.अतिवृष्टीने अडचणीत सापडलेल्या भागाची पाहणी करण्यासाठी ते लातूरला आले होते. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लातूर जिल्हा दौऱ्यावर आले असता क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे,कोअर कमिटी सदस्य सत्तार पटेल,राजेंद्र मोरे, जिल्हाध्यक्ष अरुण दादा कुलकर्णी, निशांत अडसुळे यांनी भेट घेऊन ओला दुष्काळ जाहीर करा, आधारभूत किमतीपेक्षा कमी भावाने शेतमाल विकलेल्या शेतकऱ्यांना फरकाची रक्कम द्या,अतिवृष्टीने संपूर्ण राज्याला झोडपून काढले असून शेतकऱ्याच्या खरीप पिकाचे १००% नुकसान झाले त्यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये सरसकट आर्थिक मदत द्या अशा मागण्याचे निवेदन यावेळी देण्यात आले.

क्रांतिकारी शेतकरी संघटना राज्यभर संपूर्ण कर्जमुक्ती,विम्याचा प्रश्न, आणि नुकतंच अस्मानी संकटाने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ओला दुष्काळ जाहीर करावा यासाठी राज्यभर वेगवेगळ्या पद्धतीचे आंदोलन करीत असून आज मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून शेतकऱ्यांचे प्रश्न स्वतः मुख्यमंत्री सोडवतील अशी अशा शेतकऱ्यांना असल्याची भावना यावेळी शिष्टमंडळाने बोलून दाखवली.

# गंगा माऊली शुगरचा चौथा हंगाम बॉयलर अग्नी प्रज्वलन,यावर्षी कारखाना विक्रमी गाळप करणार

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यासह बीड व धाराशिव जिल्हयात गंगा माऊली शुगर ने आपली वेगळी ओळख निर्माण केली असून अल्पावधीत शेतकऱ्यांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या गंगा माऊली शुगरचे चौथे बॉयलर अग्निप्रदिपन गोटेगाव चे सरपंच तथा गंगा माऊली शुगरचे कौटुंबिक स्नेही शहाजी पवार व त्यांच्या पत्नी यांच्या शुभ हस्ते व ह.भ.प.किसन महाराज पवार,ह.भ.प.उद्धवबापूआपेगांवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.





गंगा माऊली शुगरने जिल्ह्यात व जिल्ह्याच्या बाहेर देखील आपली वेगळी ओळख उसाच्या गळीत हंगामातून तयार केली असून गेल्या गळीत हंगामात कारखान्याने केवळ साखर निर्मितीअसताना देखील सर्वाबरोबर २७०० रु भाव दिला व प्रत्येक पंधरवाड्याला हे पेमेंट ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळाले असून यामुळे शेतकऱ्यांना या कारखान्यावर विश्वासहर्ता निर्माण झाली आहे.येणाऱ्या हंगामात कारखाना चांगल्या पद्धतीनेगाळप करेल असा विश्वास यावेळी बोलताना कारखान्याचे संचालक आदित्य पाटील व राहुल सोनवणे यांनी व्यक्त केले.यावेळी कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन हनुमंत मोरे, विखे पाटील कारखानाचे चेअरमन नवनाथ थोटे,बाबाराजे देशमुख,प्रवीणकुमार शेप,गणेश राऊत, बाळासाहेब ठोंबरे यांच्यासह सर्वसंचालक, कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.मुजावर, शेतकी अधिकारी अविनाश आदनाक व सर्व विभाग प्रमुख,व शेतकरी आदींची उपस्थिती होती.

# तोरणमाळ येथे डॉक्टरचा खोल दरीत पडून मृत्यू

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तोरणमाळ येथील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या आमदरी पॉईंटवर एक दुर्दैवी घटना घडली आहे. येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुभाष रवींद्र जगताप (वय २८, रा. सावळा, ता. बुलढाणा) यांचा खोल दरीत पाय घसरून पडून मृत्यू झाला. २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता ही घटना घडली असून, म्हसावद पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.



डॉ. जगताप हे संध्याकाळी आमदरी पॉईंटवर फिरायला गेले असताना, त्यांचा अचानक तोल गेला आणि ते थेट खोल दरीत कोसळले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच म्हसावद पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक नितीन कामे, उपनिरीक्षक जितेंद्र पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.स्थानिक सामाजिक कार्यकर्ते जीवन रावताळे आणि करमसिंग चौधरी यांच्या मदतीने पोलिसांनी मृतदेह दरीतून बाहेर काढला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी राणीपूर येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला. वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज खर्डे यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन केला.

ही घटना अत्यंत दुःखद असून, या प्रकरणी पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक नितीन कामे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक जितेंद्र पाटील करत आहेत. एका तरुण आणि कर्तृत्ववान डॉक्टरच्या अकाली निधनाने तोरणमाळ परिसरात शोककळा पसरली आहे.

संपादकीय

# महाराष्ट्रात महाप्रलय



महाराष्ट्रावर महाप्रलयाचं संकट आलं आहे. नेहमीपेक्षा थोडा लवकरच सुरू झालेला पाऊस नवरात्रीतही आषाढासारखा कोसळतो आहे. अहिल्यानगरच्या दक्षिण भागापासून मराठवाड्याला कवेत घेत या पावसाने अर्ध्या विदर्भालाही अक्षरशः झोडपून काढलं आहे. सोलापूर आणि जळगाव जिल्ह्याचा काही भागही या पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. जेमतेम पर्जन्यमानाच्या या प्रदेशाला कोकणापेक्षा अधिक मुसळधार पाऊस सोसणं कठीण आहे. पावसाच्या दीर्घकाळ आणि काही ठिकाणी ढगफुटीसारख्या कोसळण्याने या भागातील जनजीवन पूर्ण उद्ध्वस्त झालं आहे. विशेषतः शेतीचं झालेलं नुकसान अपरिमित आहे. महाराष्ट्राला मे महिन्यापासून पावसाचे चातकापेक्षाही जास्त वेध लागतात. अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवू लागते. टँकरने होणारा पाणीपुरवठाही अपुरा पडू लागतो. माणसांना स्वतःच्या गरजा आणि पाळीव जनावरांच्या पाण्याच्या गरजा कशा भागवायच्या असा प्रश्न सतावत असतो. त्यामुळे, एकदा पाऊस सुरू झाला, की निम्मा महाराष्ट्र सुटकेचा निःश्वास टाकत असतो. राज्याचा त्यापेक्षा अधिक भाग पावसाने धरणं भरावी, तळी-विहिरी भराव्यात एवढीच माफक अपेक्षा ठेवून असतो. यावर्षी अनेक ठिकाणी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच पाणी चांगलं भरलं. जलाशय तुडुंब झाल्याने ग्रामीण भागात समाधान पसरलं. लोक उत्साहात होते. पण, ऑगस्टच्या शेवटापासून पावसाने आणखी जोर धरला तेव्हाच निम्म्या महाराष्ट्राचे धाबे दणाणले. नंतरच्या पावसाने शेतीचं, फळबागांचं नुकसान सुरू केलं. मराठवाड्यात आणि उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात याच काळात ढगफुटीसदृश पाऊस झाला.परतीचा पाऊस जाता जाता दोन-चार ठिकाणी तडाखा देत असतोच. तसा इतिहास आहे. त्यामुळे, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीला झालेलं नुकसान तिथेच थांबेल, अशी अटकळ होती. पण, प्रत्यक्षात पावसाचा जोर आणखी वाढला. सप्टेंबरचा दुसरा पंधरवडा उलटूनही पावसाचा जोर कमी होत नाही, हे लक्षात आलं, तेव्हाच जाणकारांना या वर्षीच्या महाराष्ट्रावरच्या संकटाची चाहूल लागली. अहिल्यानगरच्या दक्षिण भागातल्या दुष्काळी पट्ट्यातही असा पाऊस झाला, की गावंच्या गावं पुराने वेढली गेली. चारचाकी गाड्या वाहून जातील, एवढ्या वेगाने पाण्याचे प्रवाह ऐन गावांतून वाहत होते. गेल्या दोन दिवसांत पावसाचा हाच जोर सर्वदूर पसरला आहे. महाराष्ट्राचे अनेक जिल्हे आणि त्यातील अनेक तालुके अक्षरशः पाण्यात बुडाले आहेत.महाराष्ट्रात यापूर्वीही पूर आले, महापूर आले. पण, अनेक जिल्ह्यांत एकाचवेळी रबरी बोटी आणि लष्कराच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने ग्रामस्थांची, नागरिकांची सुटका करण्याची वेळ आली नव्हती. ती यावेळी आली आहे. या महाप्रलयाला 'महा' का म्हटलं, ते यावरून लक्षात येईल. या पावसाळ्यात हिमालयात अनेक ठिकाणी ढगफुटी झाल्या. पर्वताचे मोठे भाग ढासळले. गावंच्या गावं वाहून गेली. पंजाबातही ३० जणांचा बळी घेऊन पावसाने आपला रुद्रावतार दाखवला. पण, महाराष्ट्रात पठारी भागात पावसाने सातत्याने आपलं तांडव चालवलं असल्याने या भागातल्या उभ्या पिकांचं, फळबागांचं, शेतजमिनींचं, गाईगुरांचं आणि लोकांच्या निवाऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. पावसाने गावंच्या गावं साफ केली आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारला मोठी मदत करावी लागणार आहे. सुदैवाने या संकटाची चाहूल आधीच लागली असल्याने सरकारची यंत्रणाही बऱ्यापैकी तयारीत आहे. मंत्रिमंडळाच्या कालच्या बैठकीत त्यामुळे परिस्थितीचा आढावा घेऊन मदतीची प्राथमिक घोषणा झाली, ती दिलासादायक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरग्रस्तांना दिलेला दिलासाही खूपच आश्वासक ठरला आहे.आपत्तीग्रस्त परिस्थितीचा पूर्ण आढावा घेऊन सर्व पंचनामे झाल्यानंतर एकत्रित मदत करण्याची पद्धत आतापर्यंत होती. यावेळी मात्र परिस्थितीनुसार जसजसे पंचनामे होत जातील, त्या त्या ठिकाणी त्यानुसार मदत पोहोचवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला, ही फार चांगली गोष्ट झाली. त्यामुळे, मदत लवकर पोहोचेल आणि पुनर्वसनालाही लवकर सुरुवात होईल. धोका एवढाच, की यामुळे पंचनाम्यांबाबतच्या तक्रारी दीर्घकाळ सुरू राहतील. त्या राहूच नयेत, यादृष्टीने स्थानिक प्रशासनाला सक्त सूचना देण्याची गरज आहे. या महाप्रलयातून ज्यांची सुटका करावी लागली, त्यांची संख्या शेकड्यात असली, तरी विस्थापितांची संख्या काही लाखांत असणार आहे. घरांची पडझड, शेतजमिनींचं नुकसान, शाळांच्या, तलाठी कार्यालय- ग्रामपंचायत इमारतींचं नुकसानही मोठं असणार आहे. एवढा सगळा भार राज्य सरकार एकट्याच्या बळावर उचलू शकेल, असं दिसत नाही. त्यासाठी केंद्र सरकारच्या सढळ मदतीची गरज जाणवणार आहे. देशात अनेक ठिकाणी हे अस्मानी संकट कोसळलं असल्याने केंद्र सरकारलाही त्याची जाणीव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्या आनुषंगाने केंद्रातील महत्त्वाच्या मंत्र्यांना, अधिकाऱ्यांच्या पथकाला पाहणी करण्यास सांगून मदत जाहीर करतीलच. या मदतीचा समन्वय ठेऊन त्यातून प्रभावी काम होणं आणि कमीत कमी वेळेत ग्रामीण जीवन पूर्वपदावर आणणं हेच पुढचं आव्हान आहे. स्वयंसेवी, नागरी संस्थांनीही त्यासाठी लगेच पुढाकार घ्यायला हवा.

# शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि व्यापारी महासंघाचा एसटी आगाराला इशारा

## तळोदा-अक्कलकुवा तालुक्यांतील बससेवा तातडीने सुधारण्याची मागणी

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा आणि अक्कलकुवा तालुक्यातील नागरिकांना होणाऱ्या बस वाहतुकीच्या त्रासाविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि व्यापारी महासंघ आक्रमक झाले आहेत. तळोदा तालुका प्रमुख विपुल कुळकर्णी यांच्या नेतृत्वाखालील पदाधिकाऱ्यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या अक्कलकुवा आगारप्रमुखांना एक निवेदन दिले आहे. यामध्ये, विविध बससेवा पूर्ववत सुरू करणे, बसेसची स्थिती सुधारणे आणि बस स्थानकातील सोयीसुविधा वाढवण्याची मागणी करण्यात आली असून, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.निवेदनात म्हटले आहे की, अक्कलकुवा-पुणे आणि अक्कलकुवा-मुंबई या दोन महत्त्वाच्या बससेवा बंद झाल्यामुळे विद्यार्थी आणि नोकरदारांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी या शहरांमध्ये वास्तव्यास आहेत आणि बसेस बंद झाल्याने त्यांना त्रास



सहन करावा लागत आहे. तसेच, तळोदा-वापी बससेवा देखील नियमितपणे सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तळोदा येथून धुळे, औरंगाबाद आणि नाशिकला जाणाऱ्या बसेसची अवस्था अत्यंत वाईट असून, त्या स्वच्छ आणि सुस्थितीत नसतात, अशी तक्रार निवेदनात केली आहे. याशिवाय, तळोदा ते नंदुरबार या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावर दिवसभरात केवळ दोनच बस फेऱ्या उपलब्ध आहेत. या बसेसची स्थितीही खराब असून, नागरिकांना नाइलाजाने खासगी वाहनांचा वापर करावा लागत आहे. बस फेऱ्यांची संख्या वाढवण्याची आणि बसेस सुस्थितीत ठेवण्याची मागणी जोर धरत आहे.

तळोदा बस स्थानकात सोयीसुविधांचा अभाव असून, सर्वत्र अस्वच्छतेचे वातावरण आहे. यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. आगाराने याकडे तातडीने लक्ष देऊन बस स्थानकाची स्थिती सुधारणे आवश्यक आहे.

निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे की, जर या मागण्यांची दखल घेतली नाही तर राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तसेच थेट परिवहन मंत्र्यांकडे तक्रार करण्यात येईल. तरीही प्रश्न न सुटल्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट आणि व्यापारी महासंघातर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या निवेदनावर तळोदा तालुका प्रमुख विपुल कुळकर्णी, व्यापारी महासंघ अध्यक्ष आनंद सोनार,शहर प्रमुख देवा कलाल, तळोदा युवासेना उप शहर प्रमुख हर्षल चौधरी, भूषण सोनार, निखिल सोनार, इमरान भाई, जितू गुरव आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

# केज तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना आडसकरांचा मदतीचा हात,किराणा किट वाटप करून दिला दिलासा

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मांजरा पट्यातील राजेगाव,दैठणा,भोपला या गावांमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या घरांमध्ये पाणी शिरले असून, म्हैस,बैल,गाई अशा जनावरांचेही जीव गेले आहेत.पिकांचेहीमोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून,शेतकरी आणि मजुरांच्या हाताला काम राहिलेले नाही.याआपत्तीकाळात शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी रमेशराव आडसकर व ऋषीकेश भैय्या आडसकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२४ सप्टेंबर बुधवार रोजी किराणा किट वाटपाचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमातून प्रभावित शेतकरी कुटुंबांना तातडीचा दिलासा देण्यात आला.

या वेळी रमेशरावजी आडसकर,ऋषिकेश भैय्या आडसकर,कृषी उत्पन्न बाजार समिती केजचे सभापती श्री. अंकुशरावजी इंगळे, दिलीप आबा गुळभिले, तालुका अध्यक्ष अमर भैय्या पाटील,शिवदास तात्या पाटील तसेच सर्व सहकारी,कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.या सामाजिक उपक्रमामुळे गावकऱ्यां मध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून,संकटाच्या काळातही आडसकर व त्यांचे कार्यकर्ते एकत्र येऊन मदतीसाठी पुढे येतात हे या उपक्रमातून दिसून आले.स्थानिक प्रशासन व सामाजिक कार्यकर्त्यांकडून अशा प्रकारच्या मदतीची अपेक्षा आगामी काळातही व्यक्त करण्यात येत आहे.



# तळवे गावात केळी पिकावरील शेतीशाळा यशस्वीरित्या पार पडली

**बोरद । मंगेश पाटील**

तळवे गावात महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत २३ सप्टेंबर २०२५ रोजी केळी पिकावर आधारित एकदिवसीय शेतीशाळा आयोजित करण्यात आली होती. 'हॉर्टसॅप' योजनेअंतर्गत झालेल्या या कार्यक्रमात शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे मार्गदर्शन करण्यात आले. या शेतीशाळेचे अध्यक्षस्थान माजी सरपंच मोग्या कृष्णा भिल यांनी भूषवले, तर ग्रामसेविका सुवर्णा वळवी आणि महेंद्रभाई पाटील यांचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्ञानोपासक आणि अध्यापक अविनाश वानखेडे यांनी शेतकऱ्यांना केळीच्या पिकातील खत व्यवस्थापन आणि त्यावर येणाऱ्या विविध रोगांविषयी सखोल माहिती दिली. शेतकऱ्यांनी




त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेत आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

यावेळी कृषी विभागाचे अधिकारी एस.डी. दाणी (उपकृषी अधिकारी), जगदीश शिरसाठ (सहाय्यक कृषी अधिकारी), एन.एम. पावरा (सहाय्यक कृषी अधिकारी) आणि जी.जे. पावरा (सहाय्यक कृषी अधिकारी) यांचीही विशेष उपस्थिती होती.

या शेतीशाळेत तळवे गावातील विजय पाटील, भरत पाटील, अरुण पाटील, छोटू कलाल यांसारख्या अनेक प्रगतिशील शेतकऱ्यांसह मोठ्या संख्येने इतर शेतकरीही सहभागी झाले होते. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना केळी पिकाच्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी महत्त्वाची माहिती मिळाली आणि त्यांच्या ज्ञानात भर पडली, ज्यामुळे त्यांच्या शेतीत निश्चितच फायदा होईल.

# नंदुरबार जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांचा एमआयडीसी भालेर दौरा: पायाभूत सुविधांच्या कामांची केली पाहणी

**नंदुरबार । दिपक गोसावी**

दि. २३ सप्टेंबर रोजी नंदुरबारच्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी एमआयडीसी भालेर क्षेत्राला भेट देऊन तेथील सुरू असलेल्या कामांची सखोल पाहणी केली. या दौऱ्याचा मुख्य उद्देश परिसरातील पायाभूत सुविधांची प्रगती, सद्यस्थिती आणि पुढील विकास कामांचे नियोजन तपासणे हा होता.

या महत्त्वपूर्ण दौऱ्यावेळी त्यांच्यासोबत अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने दराडे (अधीक्षक अभियंता, MSEDCL नंदुरबार), सुधाकर गांधिले (कार्यकारी अभियंता, सिव्हिल, धुळे), रविंद्र चौधरी (कार्यकारी अभियंता, $EM^2$, छत्रपती संभाजीनगर), स्वप्निल ए. पाटील (उपअभियंता, धुळे), संजय वसावे (कनिष्ठ



अभियंता, धुळे) आणि ठेकेदार संजय कोळंकार (M/s Giriraj) यांचा समावेश होता.या भेटीदरम्यान, एमआयडीसी भालेरमध्ये सुरू असलेल्या विकास प्रकल्पांविषयी तपशीलवार माहिती सादर करण्यात आली. तसेच, प्रलंबित असलेली सर्व कामे ठरलेल्या वेळेत आणि उच्च दर्जाचे राखत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.डॉ. सेठी यांनी यावेळी उद्योग आणि गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी उत्कृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधा किती महत्त्वाच्या आहेत, यावर विशेष भर दिला. त्यांनी स्पष्ट केले की, मजबूत आणि कार्यक्षम पायाभूत सुविधांमुळेच स्थानिक आणि परदेशी गुंतवणुकदारांना आकर्षित करता येते, ज्यामुळे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळेल.हा दौरा स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि एमआयडीसी भालेरची कार्यक्षमता वाढवण्यासाठी जिल्हा प्रशासनाची कटिबद्धता दर्शवितो.

# शेतकऱ्यांचे पीक कर्जासाठी सेव्हिंग खात्याला लावलेले होल्ड तात्काळ काढावे-छावा संघटना

**हनुमंत । चंदनकर नायगांव**

गेल्या दोन महिन्यापासून नांदेड जिल्ह्यासह तालुक्यात मोठ्या प्रमाणात ढगफुटी सदृश अतिवृष्टी झाली असून शेतकऱ्यांनचे हजारो हेक्टर जमिनी पाण्याखाली गेल्या आसून शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे बायकोच्या गळ्यातील मंगळसूत्र विकून पेरणी करतो आणि हाताला आलेला घास अक्षरशः डोळ्यासमोर वाहून गेल्यामुळे शेतकरी हतबल झाला असून त्यांच्या जखमेवर नमक टाकण्याच काम राष्ट्रीयकृत बँका पीककर्ज थकीत झाले आहे असं सांगून शेतकऱ्यांनचे रोजच्या व्यवहाराचे सेव्हिंग खाते होल्ड करत आहे यामुळे तालुक्यातला शेतकरी दुहेरी अडचणीत आला आहे तरी होल्ड केलेले खाते लवकरात लवकर होल्ड काढून द्यावे अन्यथा बँकेसमोर सर्व शेतकऱ्यांना सोबत घेऊन मोर्चा काढणार यासाठी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले यावेळी छावाचे जिल्हा उपाध्यक्ष विनायक पाटील माहेगावकर व छावाचे




तालुकाध्यक्ष साई पाटील मोरे यांच्या स्वाक्षऱ्यासह शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सरसकट ५० हजार रुपये मदतीसह कर्जमाफी करा-होके पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाला आहे त्यामुळे शासनाने पंचनाम्याची भाषा न करता सरसकट हेक्टरी ५० हजार रु मदतीसह शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी अशी मागणी माजलगाव तालुका काँग्रेसचे अध्यक्ष नारायण होके पाटील यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली. यावेळी दिलेल्या निवेदनात ते म्हणाले कि मराठवाड्यात अतिवृष्टीने कहर केला आहे या अस्मानी संकटामुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच कापूस, सोयाबीन सह पूर्ण खरिपाचे पीक पाण्याखाली गेलं आहे तर या पूर परिस्थितीमुळे नदीकाठी असलेल्या अनेक गावातील गोठ्यातील जनावरे, शेतीसाहित्या सह घरातील धान्य, संसारोपयोगी वस्तू सुध्दा वाहून गेल्याने शेतकरी अक्षरशः उध्वस्त झाला आहे त्यामुळे शासनाने पंचनाम्याची भाषा न करता सरसकट हेक्टरी ५० हजार रु मदतीसह या



अतिवृष्टीमुळे प्रचंड अडचणीत सापडलेल्या शेतकरी कर्जमाफीची हिच ती योग्य वेळ समजून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण कर्जमाफी कारावी.

अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने तालुका अध्यक्ष नारायण होके पाटील यांनी केली.

# शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा; ओढे-नाल्यावरील अतिक्रमण तात्काळ हटवा-पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील



**शिर्डी । प्रतिनिधी**

कोल्हार, हनुमंतगाव, पाथरे व पंचक्रोशीतील गावांमध्ये पावसामुळे झालेल्या शेतीपीकांच्या नुकसानीची तातडीने सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, तसेच ओढे-नाल्यांवरील अतिक्रमण कोणालाही पाठीशी न घालता एका महिन्यात हटविण्याचे सक्त निर्देश जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.अतिवृष्टीमुळे भगवतीपूर, पाथरे, हनुमंतगाव या परिसरात शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अतिक्रमणामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडवला गेल्याने पाणी शेतात घुसल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर नुकसानीची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महसूल, कृषी, जलसंपदा, बांधकाम यासह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची लोणी येथे बैठक झाली.बैठकीस शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, राहाता तहसीलदार अमोल मोरे, कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता श्रीनिवास वर्पे, जलसंपदा विभागाचे स्वप्निल काळे आदी अधिकारी तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.अतिक्रमणामुळे झालेल्या नुकसानीबाबत पालकमंत्र्यांनी महसूल व जलसंपदा विभागाला संयुक्त पाहणी करून तातडीने ओढे-नाले अतिक्रमणमुक्त करण्याचे आदेश दिले. आवश्यक असल्यास मोजणी करून कार्यवाही करावी, कोणतेही अतिक्रमण सहन केले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.अनधिकृत प्लॉट विक्रीच्या तक्रारींच्या अनुषंगाने कोल्हार व लोणी खुर्द येथील प्लॉट व्यवहारांची पुन्हा तपासणी करावी, नियमांनुसार सर्व तरतुदी पूर्ण झाल्याची खात्री करूनच व्यवहार करण्यात यावेत, असे निर्देश प्रांताधिकारी व तहसीलदारांना देण्यात आले.कृषी विभागाने सरसकट पंचनामे करावेत तसेच ई-पिक पाहणीतील मर्यादाही लक्षात घ्याव्यात. ज्यांनी पीकविमा योजनेत सहभाग घेतलेला नाही अशा शेतकऱ्यांना शासन नियमांनुसार मदत मिळेल यासाठी प्रयत्न करावेत, असेही मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

वन विभागाने बिबट्याच्या वाढत्या हालचालींवर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना कराव्यात, पिंजरे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करावा, निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली. पशुसंवर्धन विभागाने लंपी साथीबाबत गांभीर्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचेही निर्देश त्यांनी दिले.

# महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार विद्या भडके यांना प्रदान

**शेवगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षिका पुरस्काराने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव (ता. शेवगाव) येथील शिक्षिका विद्या रामभाऊ भडके यांना मुंबईत गौरविण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भडके यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी राज्याचे विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, प्रधान शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, शिक्षण संचालक महेश पालकर, राज्याचे पाठ्यपुस्तक मंडळाचे संचालक कृष्णकुमार पाटील आदी उपस्थित होते.

लेखिका तथा कवियत्री असलेल्या विद्या भडके या नागरदेवळे (ता. नगर) येथील रहिवाशी असून, श्री शिवाजी हायस्कूल बोधेगाव येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. साहित्य क्षेत्रात सातत्याने करीत असलेले



उत्कृष्ट लिखाण आणि त्याचबरोबर कवितासंग्रह, कथालेखन यांच्या माध्यमातून सामाजिक समस्येवर प्रकाश टाकण्याचे काम त्या करत आहे. विद्यादान करीत असताना अनेक विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम त्यांनी केले आहे. विविध क्षेत्रात त्यांचे माजी विद्यार्थी कार्यरत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बहुसंख्य विद्यार्थी शैक्षणिक, कला व क्रीडा क्षेत्रात जिल्हा, विभागीय तसेच राज्य पातळीवर यशस्वी झाले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना पुरस्काराने सन्मानित केले आहे.

भडके यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव ड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, श्री शिवाजी हायस्कूलचे मुख्याध्यापक अशोक मोरे, पर्यवेक्षक सुनील साबळे, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच भाऊसाहेब पानमळकर, रयत प्रतिष्ठानचे पोपट बनकर, प्रा. सिताराम जाधव, अनिल धाडगे, संजय भडके, ड. महेश शिंदे, भाऊसाहेब कासार, आश्विनी विधाते, स्वाती बनकर आदींसह ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# मेट्रोचे सर्व टप्पे २०२६ अखेर पर्यंत प्रवाशांकरिता खुले होतील-मुख्यमंत्री

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाण्यातील मेट्रो ४ आणि मेट्रो ४ अ या मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्सला जोडणाऱ्या मेट्रो ११ या मार्गिकेला जोडण्यात येणार असल्याने ही ५८ किमी लांबीची देशातील सर्वात मोठी मेट्रो मार्गिका ठाणेकर आणि मुंबईकरांसाठी उपलब्ध होणार आहे. पुढच्या वर्षाच्या शेवटापर्यंत या मेट्रोचे सर्व टप्पे प्रवाशांकरिता खुले होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मेट्रो मार्ग ४ (वडाळा-कासारवडवली) व ४ अ (कासारवडवली-गायमुख) च्या टप्पा-१ गायमुख जंक्शन गायमुख गाव- घोडबंदर रोड-कासारवडवली- विजय गार्डन या मार्गिकेच्या प्राधान्य विभागावर तांत्रिक तपासणी व ट्रायल रनची सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आली. प्रसंगी उपमुख्यमंत्री तथा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अध्यक्ष एकनाथ शिंदे, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार निरंजन डावखरे, माजी आमदार रवींद्र फाटक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव नवीन सोना, कोकण



विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ तसेच नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मेट्रो मार्ग ४ आणि ४ अ बद्दल माहिती देताना म्हणाले की, घाटकोपर-मुलुंड -गायमुख या मेट्रो मार्गिकेची एकूण लांबी ३५ किलोमीटर असून मेट्रो ४ ची ३२ कि.मी. आणि मेट्रो ४ अ ची २.८८ कि.मी. आहे. मार्गिकेत एकूण ३२ स्थानके असून या प्रकल्पासाठी १६ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मेट्रो ४, मेट्रो ४ अ, मेट्रो १० आणि मेट्रो ११ या सर्व मेट्रोसाठी डेपो तयार करण्याकरिता भोगरपाडा येथे ४५ हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या मेट्रो मार्गिकेचा विशेष फायदा असा आहे की, पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, मुंबई शहर आणि ठाणे शहर या सर्व मार्गांना जोडणारा हा मार्ग असणार आहे. पुढे ही मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी टर्मिनसला जोडणाऱ्या मेट्रो ११ ला जाडली जाणार आहे. त्यामुळे ही ५८ किमी लांबीची देशातील सगळ्यात मोठी मेट्रो मार्गिका निर्माण होणार आहे. या मेट्रोच्या सर्व मार्गिका सुरु झाल्यावर यामध्ये १३ लाखापेक्षा जास्त दैनंदीन प्रवासी प्रवास करतील. या मेट्रोमुळे रस्त्यावरची वाहतूक मोठ्या प्रमाणात कमी होईल. पुढच्या वर्षाच्या शेवटापर्यंत या मेट्रोचे टप्प्याटप्प्याने सर्व टप्पे प्रवशांकरिता खुले झाले पाहिजेत असा प्रयत्न आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

## घर घर लंगर सेवेचा पूरग्रस्तांना मदतीचा हात

# करंजीतील १६ पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य वाटप

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

आपत्तीच्या काळात मदतीला धावून जाणाऱ्या गुरू अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर घर लंगर सेवा ने पाथर्डी तालुक्यातील करंजी गावातील पूरग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात दिला आहे. अलीकडील पुरामुळे करंजी येथील १६ घरे पूर्णपणे वाहून गेली असून, कुटुंबीयांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. या संकटग्रस्त कुटुंबांना आधार देण्यासाठी लंगर सेवेच्या वतीने स्वयंपाकघरातील साहित्य व भांडी वाटप करण्यात आले.

करंजी येथील उत्तरेश्वर मंदिराच्या प्रांगणात हा मदत वाटप कार्यक्रम पार पडला. स्वयंपाकघरातील साहित्य, भांडी आणि अन्य आवश्यक वस्तू मिळाल्याने पूरग्रस्त कुटुंबांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. या कार्यात हरजीतसिंह वधवा, प्रीतपालसिंह धुप्पड, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत,



सुनील थोरात, अनीश आहुजा, कैलाश नवलानी, सनी वधवा, करण धुप्पड, किशोर रंगलानी, मुन्नाशेठ जग्गी, राजू जग्गी, सोमनाथ चिंतामणी, अस्नूर धुप्पड या सेवादारांनी सक्रिय सहभाग घेतला.

या कार्यक्रमासाठी माजी सभापती मिर्झा मनियार, सरपंच रफिक शेख, माजी ग्रामपंचायत सदस्य छगनराव क्षेत्रे, सामाजिक कार्यकर्ते सुभाष अकोलकर, दत्तकृपा मेडिकलचे संचालक बाळासाहेब अकोलकर, डॉ. चंद्रशेखर अकोलकर आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.गुरू अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठानची घर घर लंगर सेवा नेहमीच आपत्तीच्या वेळी मदतीला धावून जाते. यापूर्वी कोल्हापूर, सांगली व शेवगाव भागातील पूरग्रस्तांना मदत पोहोचवली होती. नुकतेच पंजाबमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्यावर तेथेही मदत पोहोचवण्यात आली. पंजाबसाठी आतापर्यंत १०,००० कपडे, ओडोमॉस व मच्छर अगरबत्त्या, दूध पावडर पाठविण्यात आले असून, लवकरच जनावरांचे खाद्य व औषधेही पाठविण्यात येणार आहेत.गुरू अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठानकडून अहिल्यानगर शहरात दररोज संध्याकाळी गरजूंसाठी मोफत अन्नसेवा (लंगर सेवा) सुरू आहे. पूरग्रस्तांसाठी मदतीचे कार्य अद्यापही सुरू असून, इच्छुक दाते व समाजातील बांधवांनी या सेवेत हातभार लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या माध्यमातून अधिकाधिक कुटुंबांना तातडीची मदत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.

# कर्मवीरांचे कार्य समाजासाठी दीपस्तंभ-छायाताई काकडे



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक व प्राथमिक विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या सौ. छायाताई काकडे तर प्रमुख उपस्थितीत प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. लक्ष्मीताई आहेर, माजी प्राचार्य अंगद काकडे, तसेच विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका सौ. लक्ष्मीताई आहेर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाजकारणातील योगदानाचा उल्लेख करून त्यांच्या कार्याची आठवण करून दिली. रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले प्रयत्न आजही मार्गदर्शक असल्याचे ते म्हणाल्या. प्राचार्या छायाताई काकडे म्हणाल्या की, कर्मवीर भाऊराव पाटील हे खऱ्या अर्थाने शिक्षणाचे संत होते. त्यांनी आयुष्यभर अस्पृश्यता, गरिबी आणि अशिक्षितपणा याविरुद्ध लढा दिला. स्वावलंबी शिक्षण हा त्यांचा मंत्र प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात मार्गदर्शक ठरावा. त्यांनी सुरू केलेल्या रयत शिक्षण संस्थेमुळे ग्रामीण भागातील लाखो मुले-मुलींना शिक्षण मिळाले आणि त्यांचे भविष्य घडले. आज आपण जेव्हा शाळेत शिकतो, ज्ञान मिळवतो, तेव्हा या संस्थापकांच्या त्यागाचे स्मरण ठेवणे गरजेचे आहे. भाऊराव पाटील यांचे जीवन हे कष्ट, त्याग आणि सेवाभाव याचे प्रतीक आहे. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून प्रत्येकाने शिक्षण घेऊन समाजासाठी योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमात शिक्षकांनी कर्मवीरांच्या कार्यावरील विचार मांडले.

# पीचडी विद्यार्थ्यांच्या फेलोशिपसाठीचा लढा सहाव्या दिवशीही सुरूच

## खा.लंके यांनी घेतली आंदोलक विद्यार्थ्यांची भेट

**पुणे । प्रतिनिधी**

गुडलक चौक, कलाकार कट्टा येथे पीएचडी विद्यार्थ्यांचे फेलोशिपसाठीचे आंदोलन आज सहाव्या दिवशीही सुरू आहे. पावसात भिजत, रात्रंदिवस रस्त्यावर ठाण मांडून बसलेले विद्यार्थी शासनाच्या उदासीनतेविरोधात आवाज बुलंद करत आहेत. आंदोलनात मुलींचाही उत्स्फूर्त सहभाग असून त्या रात्री उशिरापर्यंत रस्त्यावरच ठामपणे बसून आहेत.आज शनिवारी रात्री खा.निलेश लंके यांनी रात्री आंदोलन स्थळी भेट देऊन पाठींबा दर्शविला आहे. आम्ही भिक मागत नाही, आम्ही संशोधनासाठीचा हक्क मागतो आहोत. २०२३-२४ व २०२४-२५ चे पीचडी विद्यार्थी तात्काळ फेलोशिपस पात्र ठरावेत, नोंदणीपासूनचा कालावधी मोजून फेलोशिप लागू व्हावी,थकीत व प्रलंबित फेलोशिप



तातडीने मिळावी, अधिछात्रवृत्तीच्या जाहिराती प्रसिद्ध करून सर्वांना लाभ मिळावा, संशोधन दाबले तर शेतकऱ्यांचे भविष्य, कृषी विज्ञानाचे अस्तित्व आणि समाजाचा विकास धोक्यात येईल, असा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे.खा.लंके आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांना भेट देत त्यांच्या वेदना ऐकल्या व या लढ्याला पाठिंबा दिला. सरकारने उदासीनता सोडून तात्काळ सकारात्मक निर्णय घेतला पाहिजे. अन्यथा या तरुणांचा आक्रोश आणखी प्रखर होईल असे खा.लंके यांनी म्हंटले आहे.

# नेप्तीत तुळजापूर येथून आणलेल्या पायी ज्योतीचे स्वागत करून गावातून मिरवणूक काढून घटस्थापना

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील नेप्ती येथे शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त अखंड महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री क्षेत्र तुळजापूर ते नेप्ती पायी ज्योत सोहळाचे आयोजन जय भवानी प्रतिष्ठान नेप्ती यांच्या वतीने करण्यात आले होते. हे सोहळ्याचे तिसरे वर्ष असल्याची माहिती रामदास फुले यांनी दिली.

जय भवानी प्रतिष्ठानचे शेखर कांडेकर, योगेश होळकर,अभिजीत जपकर, गोविंद कर्डिले, कुमार होळकर, गणेश जपकर, समाधान जपकर, राहुल औटी सोमनाथ राऊत, वैभव मगर, नितीन येवले, विकास जपकर, वेदांत कांडेकर ,ऋषिकेश हसनाळे, सनी त्रिंबके हे ज्योत आणण्यासाठी तुळजापूर येथे गेले होते. तुळजापूर भवानी मंदिरातील ज्योत प्रज्वलन झाल्यानंतर त्या ज्योतीने ज्योत पेटवून त्यांनी नेप्ती येथे आणली . आई जगदंबेच्या नावाचा जयघोष करत तुळजापूर येथून भक्तांनी ही ज्योत आणली या ज्योतीचे महिलांनी पंचारती ओवाळून दर्शन घेतले तर ग्रामस्थांनी



ज्योतीला पुष्पहार अर्पण करून फटाक्याच्या आतषबाजीत मोठ्या भक्ती भावात स्वागत केले .तुळजापूर ते नेप्ती या पायी ज्योतीचे नेप्ती बायपास येथून डीजेच्या गजरात वाजत गाजत जय भवानी प्रतिष्ठानच्या वतीने मिरवणूक काढण्यात आली होती . या मिरवणुकी निमित्त गावात घरासमोर महिलांनी सडा टाकून रांगोळ्या काढल्या होत्या . या मिरवणुकीत देवी भक्तांनी घोषणा करत भक्तीचे दर्शन घडविले .ही मिरवणूक पाहण्यासाठी लहान पासून मोठ्या पर्यंत सर्वांनी गर्दी केली होती .या मिरवणुकीची सांगता गावातील देवी मंदिराच्या पटांगणात झाली . नवरात्र उत्सवानिमित्त देवीच्या मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून ग्रामस्थांनी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई केली .देवीच्या मूर्तीभोवती आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. देवीच्या मूर्तीचे चांगले निरीक्षण केल्यास देवी आपल्याकडे पाहत असल्याचा भास होतो. पुरोहित राजू कुलकर्णी यांच्या हस्ते देवीच्या मूर्तीला दुध व दहीने अभिषेक घालून विधीवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली .त्यानंतर सामुदायिक आरतीचा कार्यक्रम झाला. सर्वांच्या सहभागामुळे हा मिरवणूक सोहळा यशस्वी झाला.

# पिके सडली, नदीकाठी मातीच राहिली नाही; पंचनामे करता कशाचे? -खा.बजरंग सोनवणे यांचा सवाल

## राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षांसोबत बांधावर जावून केली नुकसानीची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

दहा दिवसांपासून जिल्ह्यात अतिवृष्टी होत आहे.यामुळे नद्यानाल्यांना महापूर गेला. परिणामी, पाण्यामुळे पिके सडली आहेत. अनेक ठिकाणी मातीही खरडून गेली आहे. अशावेळी पंचनामे कशाचे करता, असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला. शिवाय ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट मदत द्या, अशी मागणीही त्यांनी केली.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे हे बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या भेटीसाठी आणि नुकसानपाहणीसाठी दौऱ्यावर आले होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे, आ.संदिप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी आ.सलीम भाई, मेहबूब शेख ,उषाताई दराडे, सुशीलाताई मोराळे आदी प्रमुख पदाधिकारी सकाळपासून या दौऱ्यात सहभागी होते. बीड तालुक्यातील पिंपळवाडी, दत्तनगर, बेलखंडी, नागझरी, शिरापूर गात, शिरूर, आर्वी, नवगण राजुरी येथील व्यापारी व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांची संवाद साधला. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यात दहा दिवसातून किमान पाच दिवस अतिवृष्टी झाली आहे. शिरूर तालुक्यातून वाहणारी सिंदफणा, पाटोदा तालुक्यातून वाहणारी मांजरा नदीने रौद्ररूप धारण केले होते. नदीकाठी असलेल्या गावात पाणी शिरले. शेतातील पिके, जमीन, विहीरी डोळ्यादेखत वाहून गेल्या. कधी नव्हे इतके पाणी नागरिकांनी पाहिले. जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे कोटींचे शासकिय मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. तर शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे नुकसान किती असेल, याचा अंदाज येत नाही.यामुळे सरकारने पंचनामे करत बसण्यापेक्षा ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट मदत करावी, अशी मागणीही खा.बजरंग सोनवणे यांनी केली.



### तर बीडमध्ये शरद पवारांच्या उपस्थितीत महामोर्चा: आ.शिंदे

यावेळी प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे म्हणाले, बीड जिल्ह्यात शेतकरी बांधवांचे प्रचंड नुकसान झाले असून या अस्मानी संकटातून शेतकऱ्यांना सक्षमपणे उभे करण्यासाठी ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. परंतु सरकार शेतकऱ्यांच्या वेदनांकडे शासन लक्ष देत नसल्याचे चित्र समोर आल्याने प्रचंड आक्रोश शेतकरी बांधवांमध्ये आहे. सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या वचनाप्रमाणे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आधार द्यावा. राज्य सरकार व ठोस पाऊल उचलत नसेल तर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बरोबर राष्ट्रवादी काँग्रेस खांद्याला खांदा देऊन उभी राहणार आहे. नाशिकप्रमाणे बीडमध्ये सुद्धा पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत बीडमध्ये महामोर्चा काढला जाईल, अशी माहिती आ.शशिकांत शिंदे यांनी दिली.

# माजलगाव तालुका १०० % ओला दुष्काळ जाहीर करा-डॉ.नाकलगावकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ढगफुटीसदृश्य पाऊस झालाय. हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत . घरादारांचे मोठे नुकसान झाले असून अनेक जनावरे दगावली आहेत . शासनाने तात्काळ पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना खालील शासकीय मदत त्वरित देण्यात यावी यामध्ये :- पीक विमा / नैसर्गिक आपत्ती मदत -३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक देण्यात यावी .

-कर्जमाफी / कर्ज मोर्टोरिअम - पीक कर्ज फेडण्यास मुदतवाढ किंवा कर्जमाफी देण्यात यावी

-महसूल वसुली स्थगिती - सरकारी महसूल




वसुली (वीज, पाणीपट्टी, कर) काही काळांसाठी थांबवली जावी किंवा २०२५-२६ रद्द करण्यात यावी .नुकसान भरपाई - घर जनावर विहिरी शेततळे पीक साठा यांचे नुकसान भरून काढण्यासाठी थेट अनुदान देण्यात यावे .महात्मा गांधी रोजगार हमी योजना (EGS) -ग्रामीण भागात रोजगाराची हमी वाढवण्यात यावी .चारा छावण्या, तात्पुरता निवारा, अन्नधान्यांची मदत, आरोग्य शिबिरे अशी मदतही पुरवली जाव्यात . अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे मा तालुकाध्यक्ष डॉ संजय नाकलगावकर यांनी वंचितच्या वतीने दिलेल्या निवेदनत म्हटले आहे.

# राष्ट्रवादी ओबीसी सेलच्या केज तालुकाध्यक्षपदी गोविंद ससाणे

**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी सेलचे केज तालुकाध्यक्ष म्हणून सोनिजवळा गावचे सरपंच पती गोविंद ससाणे यांची नुकतीच नियुक्ती झाली. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत त्यांचा सत्कार करण्यात आला व शुभेच्छा देण्यात आल्या.पत्रकारांशी बोलताना गोविंद ससाणे यांनी शासनाने जाहीर केलेल्या यादीत केवळ तीन मंडळांचा समावेश केल्याचे सांगितले.मात्र पूर्ण केज तालुक्यात अतिवृष्टी झालेली असल्यामुळे संपूर्ण तालुका यामध्ये समाविष्ट करावा,अशी मागणी त्यांनी केली. तसेच गावातील सामाजिक सलोखा बिघडलेला असून तो टिकवण्यासाठी काम केले तरच गावाचा विकास साध्य होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.दरम्यान,ओला दुष्काळ जाहीर



करावा, अशी मागणी रमेशराव आडसकर यांच्या मार्फत शासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.नदी काढच्या शेतातील विहिरी पूर्ण पणे गाळाने भरल्या असून त्या वीहीरीसाठी अनुदान देण्यात यावे, आर्थिक विकास मंडळाच्या योजना अठरापगड जातींपर्यंत तळागाळात पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन गोविंद ससाणे यांनी दिले.तसेच पक्षाने मला राष्ट्रवादी ओबीसीसेलचे नेतृत्व करण्याची संधी दिली त्या बद्दल उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार,प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांचे देखील त्यांनी आभार मानले आहेत.

# शेतकऱ्यांच्या सोबत वंचित बहुजन आघाडी ठामपणे उभी

**बीड । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीची टीम हिरापूर, ईटकुर आणि आहेर चिंचोली शिवारात जाऊन शेतकरी बहीर मामा, इनकर आदींच्या शेतातील पिकांचे प्रत्यक्ष पाहणी केली.

सतत झालेल्या अतिवृष्टीमुळे व पूर सदृश्य परिस्थितीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या कठीण प्रसंगात आम्ही शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून उभे आहोत. त्यांच्या दुःखात सहभागी होत नुकसानग्रस्त शेताची पाहणी करून त्यांना धीर दिला. शासनाने तात्काळ पंचनामे करून योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी आमची ठाम मागणी आहे.शेतकरी संकटात असताना त्यांना फक्त आश्वासनांची नव्हे, तर तात्काळ मदतीची गरज आहे.वंचित बहुजन आघाडी नेहमीच शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढत राहील.काल रात्री जिल्हाध्यक्ष



यांनी पत्राद्वारे दिलेल्या सूचनेनुसार, जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, जिल्हा सह-संघटक अर्जुन जवंजाळ, शहराध्यक्ष लखन जोगदंड, तसेच कार्यकर्ते मिलिंद सरपते व अरविंद इनकर यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यात आल्या. त्यांना स्पष्ट सांगण्यात आले की या संकटात वंचित बहुजन आघाडी सदैव तुमच्या सोबत आहे.

# त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेधार्थ केज मधील पत्रकार एकवटले

**केज । प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारावर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंगवर दगडफेक, लाथाबुक्के यांचा वापर करून भयंकर मारहाण करण्यात आली.या झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज च्या वतीने तहसील कार्यालय व पोलीस स्टेशन यांना निवेदन सादर करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,संजय भोकरे संघटक,विश्वास आरोटे सरचिटणीस,गोविंद वाकडे प्रदेशाध्यक्ष, वैभव स्वामी प्रदेश संपर्कप्रमुख यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,शाखा केज च्या वतीने निवेदन देण्यात आले. वार्तांकनासाठी गेलेल्या त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारांवर गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी जीवघेणा हल्ला केला.



झी २४ तासचे ब्युरो चीफ श्री.योगेश खरे, साम टीव्हीचे ब्युरो चीफ श्री.अभिजित सोनवणे व पुढारी न्यूजचे ब्युरो चीफ श्री.किरण ताजने यांच्यावर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंग वर दगडफेक, लाथाबुक्के यांचा वापर करून भयंकर मारहाण करण्यात आली. राज्यात पत्रकारांवर वारंवार होणारे हल्ले ही लोकशाहीला काळिमा फासणारी बाब असून चौथ्या स्तंभावर घाला घालणारी धोकादायक प्रवृत्ती आहे.पत्रकार सत्य घटनांचा आवाज बनून अन्याय,भ्रष्टाचार व सामाजिक प्रश्न प्रकाशात आणण्या साठी अहोरात्र परिश्रम घेतात.अशा लोकांवर होणारे हल्ले ही असह्य व निंदनीय बाब आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ सर्व हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी, पत्रकारांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना राबवाव्यात तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस व प्रभावी धोरण आखावे.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील,उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड,सचिव विजय बिक्कड, कार्याध्यक्ष नंदकिशोर मिसाळ,प्रसिद्धीप्रमुख पांडुरंग कसबे,पत्रकार हल्ला विरोधी समितीचे अध्यक्ष विश्वास राऊत, पत्रकार हिराचंद काळे, उपस्थित होते.

# परळी-मुंबई वंदे भारत एक्सप्रेस सुरू करून रेल्वे स्थानकात सुविधा निर्माण करावी

## मराठवाडा जनता विकास परिषद,परळी व रेल्वे विकास समितीची सिकंद्राबाद रेल्वे विभागाचे प्रबंधक डॉ.गोपालकृष्णन यांच्याकडे मागणी

**परळी । प्रतिनिधी**

मुंबई वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे सुरू करण्यासह नांदेड -पनवेल एक्सप्रेस रेल्वे गाडीच्या प्रवाशी,स्लीपर तसेच ए.सी.बोगींची संख्या तात्काळ वाढवावी तसेच परळी मार्गे पुणे,मुंबई,नागपुर,तिरूपती,अयोध्या,वाराणसी,गोवा व ईतर प्रमुख ठिकाणासाठी त्वरीत रेल्वे सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन सिकंद्राबाद रेल्वे विभागाचे प्रबंधक डॉ.आर.गोपालकृष्णन यांना दि.२३ सप्टें २५ रोजी परळी रेल्वे स्थानकात देण्यात



आले.याप्रसंगी मराठवाडा जनता विकास परीषद,परळी व रेल्वे विकास समितीचे पदाधिकारी,विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थित होती. नांदेडहुन मुंबईला जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेस रेल्वेचे कनेक्शन मिळावे म्हणून परळी येथून पहाटे निघणाऱ्या परळी- आदिलाबाद या पॅसेंजर रेल्वेची वेळ बदलावी तसेच प्रवासी जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने पुढील महत्वपूर्ण मागण्या देखील निवेदनात करण्यात आल्या आहेत.मछलीपट्टणम -बीदर, सिकंद्राबाद-बीदर इंटरसिटी एक्सप्रेस,पाटणा-पूर्णा,रायचूर-परभणी ईत्यादी रेल्वे सेवा परळी-वैजनाथ पर्यंत त्वरीत विस्तारीत करावी. यासह ईतर मागण्या करण्यात आल्या यावेळी प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष जी.एस.सौंदळे,परळी रेल्वे विकास समितीचे प्रमुख पदाधिकारी कैलास तांदळे,विलासजी ताटे,ॲड.मनोज संकाये,ज्ञानोबा अघाव,प्रा.सत्यनारायण डूबे,सुधीर फुलारी,ॲड.अरूण पाठक, अनंत इंगळे,योगेश पांडकर,सूर्यप्रकाश तुसाम यांच्यासह आदिंची उपस्थिती होती.

# भगवान बालाजी पालखी पदयात्रेला भाविकांचा प्रतिसाद

**हनुमंत चंदनकर । नायगाव**

नायगांव नरसी येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री भगवान बालाजी नवरात्र यात्रेला २२ सप्टेंबर पासून सुरुवात झाली असून यावर्षीचे यात्रेचं मुख्य आकर्षण म्हणजे पायी पालखी सोहळा आहे दररोज हनुमान मंदिर नायगाव ते भगवान बालाजी मंदिर नरसी अशीही ५ किलोमीटरची पायी पालखी सोहळा विशेष ठरत. पायी पालखी सोहळ्याची दररोज दररोज हनुमान मंदिर हेडगेवार चौक येथे हनुमान मंदिरात पूजा आरती करून पालखी नरसी कडे प्रस्थान होते या पदयात्रेकरूंचं जागोजागी जंगी स्वागत केले जाते तर अनेक ठिकाणी भाविकांकडून चहा पराळ नसत्याची व्यवस्था केली जाते पालखी पदयात्रेचे हे पहिलं वर्ष असून नायगांव शहर व तालुक्यातील हजारो भक्त सहभागी होत आहेत जागोजागी चहा नाश्त्याची व्यवस्था भक्ताकडून केली जात आहे



पालखी यात्रेच आयोजन समस्त गावकरी मंडळ नायगांव च्या वतीने करण्यात आले आहे पालखी पदयात्रा ८ वाजता मंदिर येथे पोहोचेते पुजा आरती करून सांगता होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077